प्रेस नोट                    दिनांक १९/०३/२०१८

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | १२/१८ |
| कलम | कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालय | १) मिलींद तातोबा येडेकर , वय ५० वर्षे, घंदा नोकरी, पद — वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माहिम पोलीस ठाणे, मुबई<br>२) संदीप साबाजी तेली, वय ४२ वर्षे, घंदा नोकरी, पद — पोलीस नाईक, (वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मदतनीस), माहिम पोलीस ठाणे, मुबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ५०,०००/— (तडजोडीअंती ४०,०००/—) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. २०,०००/— (पहिला हप्ता) |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे ऑर्केस्ट्रा बारचे मालक आहेत. दिनांक १७/०३/२०१८ रोजी माहिम पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक व स्टाफने फिर्यादीचे बारवर छापा टाकला होता. बारचे मॅनेजरवर महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये दोषारोपपत्र बनविण्यात आले होते. यापुढे बारवर केसेस न करण्यासाठी व कलम २९४ भादवी प्रमाणे कारवाई न करण्यासाठी मिलींद येडेकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक माहिम पोलीस ठाणे यांनी रू ५०,०००/— इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रू ४०,०००/— रकमेची लाच स्वीकारण्याचे मान्य केले.<br><br>फिर्यादीला लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात तक्रार दिली. तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करून सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा करवाई दरम्यान माहिम पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक संदीप तेली, (वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मदतनीस) याला वरीष्ठ पोलीस निरीक्षक मिलींद तातोबा येडेकर यांच्या वतीने फिर्यादी कडुन लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता रू २०,०००/— स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. दोनही आरोपी लोकसेवकांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ३०
टोल फ्री क. १०६४, दुरध्वनी क. ०२२—२४९२१२१२
फॅक्स क. ०२२—२४९२२६१८
वेबसाईट — acbmaharashtra.gov.in ईमेल— acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल — addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक — www.facebook.com-Maharashtra ACB
मोबाईल ॲप — www.acbmaharashtra.net
व्हॉट्स ॲप कमांक — ९९३०९९७७००

( एम एन मुगुटराव )
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई